PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kunku
Year: 1937

Song: Bharatisrustiche Soundarya
Lyricist: Shantaram Athavle

भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे
दावीत सतत रूप आगळे
भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे
दावीत सतत रूप आगळे
वसंत वनात जनात हासे
सृष्टीदेवी जणू नाचे उल्हासे
गातात संगीत पृथ्वीचे भाट
चैत्र वैशाखाचा ऐसा हा थाट
गातात संगीत पृथ्वीचे भाट
चैत्र वैशाखाचा ऐसा हा थाट
भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे
दावीत सतत रूप आगळे
जेष्ठ आषाढात मेघांची दाटी
कडाडे चफला कोसळते वृष्टी
घालाया सृष्टीला मंगलस्नान
पूर अमृताचा सांडे वरून
गगनी नर्तन कृष्ण मेघांचे
भूतली मयुर उत्तान नाचे
भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे
दावीत सतत रूप आगळे
श्रावणी पाऊस हास्याचा पडे
श्रीकृष्ण जन्माची दंगल उडे
बांधीती वृक्षांना रम्य हिंदोळे
कामिनी धरणी वैभवी डोळे
बांधीती वृक्षांना रम्य हिंदोळे
कामिनी धरणी वैभवी डोळे
भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे
दावीत सतत रूप आगळे
भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*